**प्रेसनोट दि. ०८/०६/२०१९**

**फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**ज्येष्ठ नागरीकास त्यांच्या घरी सुखरुप पोहचविले.**

फरासखाना पोलीस स्टेशन अंकीत गाडीतळ पोलीस चौकी येथे दिनांक ०८/०६/२०१९ रोजी गाडीतळ बीट मार्शलकडील कर्मचारी पोलीस नाईक नाना हंडाळे, व पोलीस शिपाई लक्ष्मीकांत कांबळे हे पेट्रोलींग करीत असताना त्यांना ज्येष्ठ पुरुष इसम, वय अंदाजे ८० वर्षे हा चक्कर येवुन पडलेल्या अवस्थेत मिळुन आला, त्यावेळी त्याचेवर प्राथमिक उपचार करुन तो चांगला झाल्याने त्यास कोठे राहत असलेबाबत विचारता त्यास नीट पत्ता सांगता येत नसल्याने त्यास वरील कर्मचा-यांनी गाडीतळ पोलीस चौकी येथे घेवुन येवुन त्यास जेवण देवुन, त्याची योग्य ती देखभाल करुन त्यास विश्वासात घेवुन त्याचे नातेवाईकांबाबत माहीती विचारली असता त्याने त्याचे नाव रामचंद्र चौगुले, रा. भिमनगर, उत्तमनगर, पुणे असे सांगितले, त्यांचा मुलगा नामे गुरुदत्त चौगुले, यांच्याशी संपर्क साधला असता त्याने त्यांची मुलगी प्रियंका चौगुले ही सोमवार पेठ, पुणे येथे राहत असलेबाबत सांगितले. सदर ज्येष्ठ इसमास रिक्षात बसवुन त्यांची नात प्रियंका चौगुले, सोमवार पेठ, पुणे यांच्याकडे चौकशी करुन त्यांची नात असल्याची खात्री झाल्याने सदर ज्येष्ठ नागरीकास तिच्या ताब्यात सुखरुप दिले आहे. त्याबाबत त्यांनी पोलीस दलाचे आभार मानले.

सदरची कामगिरी पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ १, श्री सुहास बावचे सो, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री प्रदीप आफळे, यांचे मार्गदर्शनाखाली श्री किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक फरासखाना पोलीस स्टेशन, तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक ए.एन.घुले, पोलीस हवालदार सुदाम बाठे, पोलीस नाईक प्रविण गोरे, पोलीस नाईक नाना हंडाळ, पोलीस शिपाई लक्ष्मीकांत कांबळे, पोलीस शिपाई बजरंग बिचुकले, यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर